## निशाणी क्र.४६ वर आदेश

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा गैरअर्जदाराचा बचाव रद्द करण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे कथन की, प्रस्तुत प्रकरणी गैरअर्जदाराकडून अंतरीम खावटीची आजपर्यंत रक्कम रु.३७,०००/– येणे बाकी आहे. गैरअर्जदार हा सदरची रक्कम भरण्यास जाणीवपुर्वक टाळाटाळ करत आहे. न्यायालयाने दि.२४/०१/२०२५ रोजी नि.क्र.१ वर आदेश पारीत करुन गैरअर्जदाराला अंतरीम खावटीच्या रक्कमेपैकी काही रक्कम भरण्याबाबत सुचीत करण्यात आले. तरी देखील गैरअर्जदाराने अंतरीम खावटिची रक्कम भरली नाही. अशाा परिस्थितीत गैरअर्जदाराचा बचाव रद्द करणे न्याय व जरुरी आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर करुन गैरअर्जदारचा बचाव रद्द करावा अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन गैरअर्जदाराने कथन केले की, गैरअर्जदार पुरावा घेण्यास तयार आहे. यापूर्वी नि.क्र.२३ व ३५ वरील अर्ज न्यायालयाने खारीज केलेले आहेत. त्यामुळे पुन्हा अशाच आशयाचा अर्ज नियमानुसार नाहीत. गैरअर्जदाराने मुळ अंतरीम पोटगीच्या आदेशाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात दाद मागितली आहे. त्यामुळे सदर अर्ज खारीज करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे तसेच दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. तसेच अर्जदार व गैरअर्जदार यांचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांचे विधिज्ञ श्री. एम. के. उंडाळ यांनी खालील न्यायनिर्णय दाखल केले आहेत.

१) कौशल्या .. वि.. मुकेश जैन नि.ता.२४/०७/२०१९ मा. सर्वोच्च न्यायालय
प्रस्तुत प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालय यांनी अंतरीम आदेशानुसार गैरअर्जदाराने खावटीची रक्कम न भरल्यास गैरअर्जदारचा बचाव रद्द करण्याची परवानगी कौटूंबीक न्यायालय यांना दिली.

२) स्वाती कौशीक ..वि.. अश्वानी शर्मा क्रि.एम.ए.नं.१२६५२/२०१७ नि.ता. ११/०२/२०१९ मा. उच्च न्यायालय दिल्ली :–
मा. उच्च न्यायालय दिल्ली यांनी गैरअर्जदार हा खावटीची थकबाकीची पुर्तता करत नसेल तर गैरअर्जदाराचा बचाव रद्द करणे योग्य ठरते असे न्यायनिर्देशीत केलेले आहे.

**५.** प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार हिने कलम १२५ नुसार खावटी मिळण्याबाबत प्रस्तुत प्रकरण दाखल केलेले आहे. नि.क्र.०४ वर अर्जदाराने अंतरीम खावटी मिळण्याचा अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज गुणदोषावर निकाली होऊन गैरअर्जदार याला आदेशीत करण्यात आले की, त्यांने अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार व तिच्या मुलीस दरमहा रक्कम रु. ३,५००/– मूळ प्रकरणाच्या अंतीम निकालापर्यंत द्यावेत. सदर आदेशाविरुध्द गैरअर्जदार यांनी मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांच्या न्यायालयात रिव्हीजन दाखल करुन फौजदारी किरकोळ अर्ज क्र.५९/२०२३ दाखल करुन नि.क्र.४ वरील आदेश आव्हानीत केलेला आहे. सदर प्रकरणी मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांनी दि.२२/०६/२०२४ रोजी आदेश पारीत करुन या न्यायालयास गैरअर्जदार यांच्याविरुध्द पुढील आदेशापर्यंत कोणतेही अटक वारंट काढू नये असे आदेशीत केलेले आहे.

**६.** अर्जदाराने नि.क्र.२३ व ३५ वर गैरअर्जदाराचा बचाव रद्द करण्याकरिता अर्ज

दाखल केले होते. सदरचे अर्ज गुणदोषावर चालवून नामंजूर करण्यात आले आहेत. त्यानंतर नि.४४ वर आदेश पारीत करुन गैरअर्जदार यांना अंतरीम खावटीची रक्कम भरण्याकरिता न्यायालयाकडून आदेशीत करण्यात आले होते. मात्र गैरअर्जदाराकडून कोणतीही रक्कम भरण्यात आली नाही. त्यानंतर देखील गैरअर्जदाराने अंतरीम खावटीची रक्कम न भरल्यामुळे नि.क्र.१ वर आदेश पारीत करुन गैरअर्जदारास अंतरीम खावटीची रक्कम भरण्यास पुन्हा आदेशीत करण्यात आले होते. मात्र न्यायालयाने आदेश पारीत करुन देखील गैरअर्जदाराने अंतरीम खावटीची रक्कम अर्जदारास दिलेली नाही. गैरअर्जदार यांनी या न्यायालयाने पारित केलेला नि.क्र.४ वरील अंतरीम खावटीचा आदेश आव्हानीत केलेला आहे. सदर प्रकरणी मा. जिल्हा न्यायाधीश, वाशिम यांनी पुढील तारखेपर्यंत कोणतेही अटक वारंट काढू नये असे आदेशीत केले होते. मात्र नि.क्र.४ वरील या न्यायालयाने पारीत केलेला आदेश अद्यापपावेतो रद्द केलेला नाही अथवा त्यास स्थगिती देखील दिलेली नाही. त्यामुळे अंतरीम खावटीची रक्कम अर्जदारास देणे गैरअर्जदारास क्रमप्राप्त आहे.

**७.** अर्जदार ही गैरअर्जदार ची पत्नी आहे. तिच्या पालनपोषणाची, वस्त्र निवा–याची, औषध–पाण्याची संपुर्ण जबाबदारी गैरअर्जदाराची व विशेषतः गैरअर्जदाराची आहे हे नजरेआड करुन चालणार नाही. अभिलेखावरील संपूर्ण परिस्थिती विचारात घेवून नि.क्र.४ वरील आदेश पारीत केलेला आहे. सदर आदेशाप्रमाणे गैरअर्जदार अंतरीम खावटीची रक्कम भरत नसेल तर कोणत्याही आर्थीक स्वरुपाच्या मागणीशिवाय अर्जदार हिस प्रस्तुतचे न्याय प्रकरण चालविण्यासाठी परिस्थीती निर्माण करणे म्हणजेच भविष्यात मिळणा–या भक्कम व सबळ मागणीसाठी अर्जदार हिला सदरच्या परिस्थीतीत उपाशीपोटी न्यायालयीन लढाई लढण्यास परिस्थीती निर्माण करण्यासारखे होईल असे झाल्यास कायद्याचा व मुळ अर्जाचा हेतू सफलतेस जाणार नाही व त्यायोगे अर्जदारावर अन्याय होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे नि.क्र.४४ व १ वर आदेश पारीत करुन देखील गैरअर्जदार याने कोणतीही अंतरीम

खावटीची रक्कम भरलेली नाही. त्यामुळे गैरअर्जदाराचा बचाव रद्द करणे योग्य व न्यायोचीत होणार आहे. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे:

**आदेश**

१. नि.क्र.४६ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार यांचा बचाव रद्द करण्यात येतो.

DINESH MUKUND GAIKWAD

Digitally signed by DINESH MUKUND GAIKWAD
Date: 2025.11.06 11:41:42 +0530

(**दिनेश मु. गायकवाड**)

दि.१०/१०/२०२५ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रिसोड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order are same word to word, as per the original **Judgment/Order.**

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | B. V. Bhisade, (Grade III) |
| Name of court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Risod. |
| Date | : | 10.10.2025 |
| Order signed by the Presiding Officer | : | 03.11.2025 |
| **Order uploaded on** | **:** | 06.11.2025 |